# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २१/०३/२०२४ (गुरूवार) सकाळ**

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक २०/०३/२०२४ रोजी १७.३० वा. ते १८.०० वा. दरम्यान पो. स्टे. खापा हद्दीत स्टाफसह पेट्रोलिंग करीत असताना मौजा कोथुर्णा बस स्टॉप येथे विना नंबरची ट्रॅक्टर ट्रॉली ही येतांना दिसली तिला थांबवून पाहणी केली असता त्यामध्ये अंदाजे ०१ ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रॅक्टर चालकास ट्रॅक्टर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्याने रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीतांकडुन (१) एक लाल रंगाचा सोलीस कंपनिचा विना नंबरचा ट्रॅक्टर व त्याला लागुन असलेली विना नंबरची ट्रॉली किंमती ६,००,०००/—रू. (२) एक ब्रास रेती किंमती ४०००/— रू (३) दोन फावडे किंमती १००/—रू. (४) दोन घमेले किंमती २००/— रू अशा एकुण ६०४३००/—रू चा मुद्देमाल जप्त करून चालक **आरोपी नामे—१) छत्रपाल शंकरराव उके वय ३६ वर्षे रा. महादुला ता. पारशिवनी २) धनराज भोयर रा. वाघोली ता. सावनेर ३) दिगांबर कवडुजी बोंद्रे, वय ३५ वर्षे रा. किरणापुर ता. सावनेर** यांचेविरूद्ध कलम ३७९, १०९, ३४ भा.दं.वी. सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे खापा येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे खापा येथील ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक सुनिल दहिभाते, पोलीस उपनिरीक्षक मिलींद गेडाम, सहायक फौजदार नारायण बोरकर, पोलीस हवालदार अनिल मुंडे, पोलीस अंमलदार पन्ना बटाउवाले, गणेश बघनुरे यांनी केली.

# अवैधरीत्या घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक

पोस्टे खापरखेडा अंतर्गत भानेगाव शिवार येथे दि. २०/०३/२०२४ चे १७.२२ वा. १७.२५ वा. दरम्यान यातील **आरोपी नामे– भुजंग जनार्दण महल्ले, वय ४२ वर्ष, रा. महाजन नगर टेकाडी कामठी** हा भानेगाव शिवारातील कोल्हार नदीच्या हनुमान मंदीर जवळ खापरखेडा येथे कोणत्यातरी हस्तक्षेपणीय गुन्हा करण्याचा उद्देशाने एक लोखंडी देसी कट्टा मॅगझीन सह (माउझर) सह कमरेत बाळगुन फिरत आहे. अशी विश्वनीय खबर मुखबीर द्वारे मिळाल्याने मोक्यावर जावुन आरोपीस ताब्यात घेवुन आरोपीची कायदेशीर रित्या अंगझडती घेतली असता आरोपीच्या ताब्यातून १) एक माउझर (देसी कट्टा) किंमती ४५,०००/–रू. २) टी. व्ही. एस कंपनीची लाल काळया रंगाची मोपेड जिचा क्र. एम एच– ४०/ सि. व्ही.–०४१६ किंमती ८०,०००/– रू असा एकुण १,२५,०००/– रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने तसेच मा. जिल्हाधिकारी साहेब यांच्या आदेशाचे उलंघन केल्याने आरोपी विरूद्ध गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे– पोलीस हवालदार प्रफुल राठोड पोस्टे खापारखेडा यांचे रीपोर्ट वरून पोस्टे खापरखेडा येथे कलम ३/२५ भारतीय हत्यार कायदा १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपीस अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक आरती नरोटे पोलीस स्टेशन खापरखेडा या करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे खापरखेडा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक धनाजी जळक व त्यांच्या पथकाने केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर